Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ५, अंक २४] गुरूवार ते बुधवार, जुलै १८-२४, २०१९/आषाढ २७-श्रावण २, शके १९४१ [पृष्ठे २४, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार - ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८६.

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जुलै २०१९.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टिपीएस-२६१९-३३४-प्र.क्र.२८-नवि-३०-२०१९.—

ज्याअर्थी, बुलडाणा शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची अधिसूचना क्र. टिपीएस-वियो-बुलडाणा(सु)-टिपी.व्ही-६-८४८६, दिनांक ०३-११-१९९० अन्वये मंजूर केली असून ती दि. ०१-०१-१९९१ पासून अंमलात आली आहे. (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे बुलडाणा, ता. व जि. बुलडाणा येथील स. नं. ३७/१ क्षेत्र २.४२ हे. आर जागा (यापुढे "उक्त जमीन " असे संबोधले आहे) कृषी विभागामध्ये दर्शविली आहे (यापुढे "उक्त विभाग " असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा नगर परिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम " असे संबोधले आहे) कलम ३७(१) मध्ये दिलेली वैधानिक पद्धती अनुसरून दि. ०३-११-२०१८ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव क्र. ७७ अन्वये उक्त विकास योजनेतील उक्त जमीन उक्त विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर केलेला आहे. (यापुढे " प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशी नंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदल काही अटींवर मंजूर करावा असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी उक्त जमिनीच्या मालकानी सन २०१८-१९ या वर्षातील बाजारमूल्य दर तक्ता नुसार येणा-या उक्त जमिनीच्या दराच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमुल्याची ५०% रक्कम रुपये १,०२,५८० नगर रचनाकार, बुलडाणा शाखा, बुलडाणा यांच्या लेखाशिर्षामध्ये दि. २५-०६-२०१९ रोजीच्या चलनाने जमा केलेली आहे, आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रुपये १,०२, ५८० बुलडाणा नगर परिषदेकडे दि. २५-०६-२०१९ रोजी जमा केलेली आहे ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ३७ पोट-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकाराचा वापर करून उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्तावास शासन काही अटीवर मंजुरी देत आहे आणि त्यासाठी उपरोक्त दिनांक दि. ०१-०१-१९९१ ची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे ;

उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनांच्या फेरबदल सूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

नोंद

" मौजे बुलडाणा ता. व जि. बुलडाणा येथील स. नं. ३७/१७ (भाग), क्षेत्र २.४२ हे. आर जागा कृषी विभागातून वगळून खालील अटींवर रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. "

अट क्र. १:–मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली प्रमाणे खुल्या जागेव्यतिरिक्त आवश्यक ते सुविधा क्षेत्र प्रस्तावित करणे बंधनकारक राहील.

अट क्र. २:–फेरबदलाखालील क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी जमीन मालक/विकासकाची राहील.

अट क्र. ३:–फेरबदलाखालील जमिनीत जर अभिन्यासात भूखंड पाडून विक्री करणे प्रस्तावित असेल तर अभिन्यासातील मुलभूत सुविधांचा विकास व भूखंड विक्रीसाठी खालीलप्रमाणे बंधने राहतील. मुख्याधिकारी, बुलडाणा नगर परिषद, जि. बुलडाणा यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवावे.

(अ)	अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यानंतर	. .	एकूण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.
(ब)	सुमारे ४०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर	. .	एकूण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.
(क)	सुमारे ६०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर	. .	एकूण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.
(ड)	सुमारे ८०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर	. .	एकूण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.
(इ)	सुमारे १००% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर	. .	एकूण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.

तसेच जर अभिन्यासात समूह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर, मुख्याधिकारी बुलडाणा नगर परिषद, जि. बुलडाणा यांनी विहित केल्यानुसार सर्व मुलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही ;

अट क्र. ४ :–वरील कोणत्याही अटींचे उल्लंघन झाल्यास रेखांकन व अकृषक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

उक्त फेरबदल दर्शविणा-या भाग नकाशाची प्रत मुख्याधिकारी, बुलडाणा नगर परिषद, जि. बुलडाणा यांचा कार्यालयांत कार्यालयीन वेळेमध्ये नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरची अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in/कायदे नियम** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

वीणा मोरे,
अवर सचिव.

———

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८७.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated 01st July 2019.

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-2619-334-CR-28-UD-30-2019.—

Whereas, the Revised Developemt Plan of Buldana City, Dist. Buldana has been sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune under Section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS-D. P./Buldana (R)/T.P.V-6/8486 dated 3rd November 1990 and has come into force with effect from the 1st January 1991 (hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan land bearing Survey No. 37/1 of Mouje Buldana, Tq. and Dist. Buldana, admeasuring 2.42 ha. (hereinafter referred to as "the said land") is included in "Agriculture Zone" (hereinafter referred to as "the said zone");

And whereas, as per the provisions of Section 37 (*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act"), the Municipal Council, Buldana *vide* its General Body Resolution No. 77 dated 3rd November 2018 has resolved to make modification in the sanctioned Development Plan of Buldana, so as to delete the said land from the said Zone and to include the same in Residential Zone (hereinafter referred to as "the proposed modification") and accordingly submitted the proposal to Government for final sanction.

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of opinion that the proposed Modification should be sanctioned with certain conditions;

And whereas, the land owners of the said lands have deposited Rs. 1,02,850 towards the 50% Government share of 5% premium amount as per the rate of said land as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2018-19 in the Government Treasury *vide* chalan dt. 25-06-2019 through the Town Planner, Buldana Branch, Buldana and the remaining 50% of the 5% premium amount of Rs. 1,02,850 has been deposited with the Buldana Municipal Council, Dist. Buldana *vide* dt. 25-06--2019;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-Section (2) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby sanctions the proposed Modification in the said Development Plan with certain conditions and for that purpose amends the abovesaid Notification dated the 1st January, 1991 as follows :-

In the Schedule of Modifications appended to the Notification sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry .—

ENTRY

"The land bearing Survey No. 37/1(part) of Mouje Buldana, Tq. Dist.- Buldana, area admeasuring 2.42 ha. is deleted from Agricultural Zone and land so released is included in the Residential Zone subject to the following conditions:-"

Condition No. 1 : In addition to open space it shall be mandatory to provide necessary amenity space required to be provided as per the sanctioned Development Control and Promotion Regulations.

Condition No. 2 : It shall be the responsibility of the Land Owner/Developer to provide basic amenities in respect of the land under modification.

Condition No. 3 : If the said land is proposed to be developed by way of plotted layout, then sale of plots shall be monitored by the Chief Officer, Buldana Municipal Council in relation to development of civic amenities as per the stages given below.

(i)	After final approval of layout	Sale of 25% of total Plots shall be permissible.
(ii)	After completion of 40% of Civic Amenities	Sale of 50% of total Plots shall be permissible.
(iii)	After completion of 60% of Civic Amenities	Sale of 75% of total Plots shall be permissible.
(iv)	After completion of 80% of Civic Amenities	Sale of 90% of total Plots shall be permissible.
(v)	After completion of 100% of Civic Amenities	Sale of 100% of total Plots shall be permissible.

If Group Housing Scheme is proposed in the layout then the occupancy certificate shall not be given unless civic amenities specified by the Chief Officer, Buldana Municipal Council are fully developed.

Condition No. 4 : In case of non-compliance of aforesaid conditions, Layout Approval and Non-Agricultural permission shall be liable to be cancelled.

A copy of part plan showing the above sanctioned modification shall be available in the office of the Chief Officer, Buldana Municipal Council, Dist.- Buldana, during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

This Notification shall also be published on the Govt. website *www.maharashtra.gov.in/Acts & Rules.*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VEENA MORE,

Under Secretary.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८८.

संचालक, नगर रचना, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.

क्रमांक डिटीपी-वि.यो.नांदुरा(सु.)-कलम-१२७(२)-आदेश–टिपीव्ही-६-३१४२-२०१९.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिलेले आहे) चे कलम ३१(१) अन्वये नांदुरा या "क" वर्ग नगरपरिषदेची सुधारित विकास योजना (यापुढे " उक्त विकास योजना " म्हणून संबोधिलेली) संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिसूचना क्र.वि.यो.नांदुरा (सु.)-११-८७-टिपीव्ही-६-८६९७, दिनांक ३१ डिसेंबर, १९८८ अन्वये मंजूर केली आहे व ती दिनांक ०१ एप्रिल, १९८९ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौ. नांदुरा येथील स. नं. २५ (भाग) व स. नं. २६ (भाग) मध्ये १.२३ हे. क्षेत्र आरक्षण क्रमांक ४६, " क्रिडांगण " (यापुढे " उक्त आरक्षण " असे संबोधिलेले आहे.) यासाठी प्रस्तावित करण्यात आले असून, त्यासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, नांदुरा आहे (यापुढे " उक्त समुचित प्राधिकरण " असे संबोधिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरण यांनी विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जागेचे संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, स. नं. २५/१ मधील ०.१८ हे. जागेचे मालकांनी दिनांक २६ जुलै, २०१५ रोजीच्या अर्जान्वये उक्त समुचित प्राधिकरणावर, उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) अन्वयेची सूचना बजावली होती ;

आणि ज्याअर्थी, स. नं. २५/१ मधील ०.१८ हे. जमीन आ.क्र. ४६ " क्रिडांगण " ने बाधित होत आहे (यापुढे " उक्त जागा " असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) अन्वयेची सूचना प्राप्त झाल्यापासून २४ महिन्याच्या कालावधीत, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त जागा संपादन केलेली नाही किंवा ती संपादन करण्यासाठी कोणतीही कार्यवाही सुरु केलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, नांदुरा यांनी पत्र क्र. १२२-१९, दिनांक ०३ मे, २०१९ अन्वये उक्त आरक्षणाच्या जागेच्या भूसंपादनासाठी नगर परिषदेने कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे कळवून उक्त आरक्षणाबाबत अधिनियमाचे कलम १२७(२) नुसार अधिसूचना निर्गमित करण्याबाबत विनंती केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) नुसार उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाले असून, उक्त अधिनियमाच्या कलम १२७(२) नुसार उक्त जागेचे क्षेत्रापुरते उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाल्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र. ५०-नावि-१३, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये सर्व नगरपालिका/नगर पंचायती आणि जिल्हा परिषद नियोजन प्राधिकरण असलेल्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ पोट-कलम (२) अन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उपकलम (२) बाबत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारात संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशान्वये नांदुरा शहराच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील आ. क्र. ४६ " क्रिडांगण " हे आरक्षण उक्त जागेपुरते (खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे) भागशः व्यपगत झाल्याबाबत अधिसूचित करीत असून, सदर मुक्त झालेली जागा, लगतच्या जमिनीवर उक्त विकास योजनेनुसार अन्यथा अनुज्ञेय होणा-या विकासाच्या प्रयोजनासाठी, जमिन मालकास विकासाकरीता उपलब्ध होईल.

परिशिष्ट

अ. क्र.	मौजे, तालुका व जिल्हा	विकास योजनेतील आरक्षण व वि.यो. अहवालानुसार क्षेत्र	खरेदी सूचनेखालील ग. नं./स.नं.	आरक्षणातून व्यपगत झालेल्या भागाचे क्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	मौजा नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा.	आ.क्र. ४६" क्रिडांगण " (१.२३ हे.)	स. नं. २५/१	० १८

उक्त आरक्षणातून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणा-या भाग नकाशाची प्रत मुख्याधिकारी, नांदुरा नगर परिषद, नांदुरा यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत ठेवण्यात येत आहे.

सदर आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर **www.dtp.maharashtra.gov.in** देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

पुणे :
दिनांक २० जून २०१९.

नो. र. शेन्डे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८९.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

ORDER

No. D.T.P.-D.P. Nandura (R)-Sec-127(2)-Order-TPV-VI-3142--2019.—

Whereas, the Director of Town Planning Maharashtra State, Pune *vide* its Notification No. D.P.Nandura (R)-11-87-TPV-6-8697, Dated 31-12-1988 has sanctioned the Revised Development Plan of Nandura (hereinafter referred to as the "said Development Plan") under Section 31 (*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and the same has come into force with effect from Date 01-04-1989 ;

And whereas, in the said Development Plan, the land admeasuring 1.23 Hect., from S. No. 25 (part) & S. No. 26 (part) of Nandura is reserved for Site No. 46 "Play Ground" (hereinafter referred to as "the said Reservation") for which Appropriate Authority is Municipal Council, Nandura (hereinafter referred to as "the said Appropriate Authority") ;

And whereas, the land under said reservation has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force ;

And whereas, the owners of 0.18 Hect. land from S. No. 25/1 had served a Notice under Section 127(*1*) of the said Act, on the said Appropriate Authority *vide* their letter date 26-07-2015 ;

And whereas, land from S. No. 25/1 admeasuring 0.18 Hect. is affected by Site No. 46 "Play Ground" (hereinafter referred to as "the said Land") ;

And whereas, the said Appropriate Authority, has not acquired or no steps as contemplated in the Section 127(*1*) of the said Act, has commenced for its acquisition within the period of twenty four months from the receipt of the aforesaid notice ;

And whereas, Chief Officer, Municipal Council, Nandura has communicated that, Municipal Council has not acquired the said land and requested to issue the order for the said reservation under Section 127(*2*) of the the said Act, *vide* letter No. 122/19, date 03-05-2019 ;

And whereas, in accordance with the provision of Section 127(*1*) of the said Act, the part of the said Reservation, pertaining to the said land, has lapsed and it is accordingly expedient to notify such lapsing under Section 127(*2*) of the said Act ;

And whereas, the Government in Urban Development Department under Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 1st December 2016, has delegated the powers exercisable by it under Section 127(*2*) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils/Nagar Panchayats and for the Development Plans undertaken by Zilla Parishads as a Planning Authority, to the Directior of Town Planning, Maharashtra State, Pune.

Now, therefore, in exercise of the powers delegated by the Government, in respect of sub-section (*2*) of Section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby notifies that the said Reservation of Site No. 46 "Play Ground" is lapsed partly only in respect of said Land

(as specified in the Schedule herein below) and the said land shall become available to the land owners for the purpose of Development as otherwise, permissible in the case of adjacent land, under the said Development Plan.

SCHEDULE

Sr. No.	Mauja, Tal, Dist.	Reservation of Development Plan & its Area as per D. P. Report	City Survey No./ Survey No./Gut No.	Area of the lapsed part of the reservation
(1)	(2)	(3)	(4)	(5)
				H. A.
1	Mauja Nandura, Taluka Nandura, Dist. Buldana	Site No. 46 "Play Ground" (1.23 H. A.)	S. No. 25/1	0 18

A Copy of the part plan showing the area which is lapsed from the said reservation, is available in the office of the Chief Officer, Nandura Municipal Council, Nandura during office hours on all working days for inspection to public up to one month.

This Order shall also be published on the Directorate web site *www.dtp. maharashtra.gov.in*

N. R. SHENDE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 20th June 2019.

———

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९०.

अध्यक्षा, नगर परिषद, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये बुलडाणा शहराच्या सुधारित अंतिम विकास योजनेत गौण फेरबदल करण्याबाबत

क्रमांक साबांवि-नपबु-५५०-२०१९.—

बुलडाणा शहराच्या सुधारित विकास योजनेस मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्र. वियो-बुलडाणा(सु)-टि.पी.व्ही.-६-८४८६, दिनांक ३-११-१९९० अन्वये मंजुरी दिलेली असून ती दि. १ जानेवारी १९९१ पासून अंमलात आलेली आहे.

उक्त विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये खालील नमूद केल्याप्रमाणे गौण फेरबदल करावयाचे आहेत. सदर फेरबदल करण्यास नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेने दिनांक २७-०२-२०१९ चे ठराव क्र. ३१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

प्रस्तावित फेरबदल :

बुलडाणा शहराच्या विकास योजनेमध्ये शेत सर्व्हे क्र. ३७/१ मधील खाजगी मालकीची ०.९६ हेक्टर आर जमीन ही कृषी तथा तत्सम वापर (नाविकास विभाग) क्षेत्र म्हणून दर्शविलेली आहे. सदर ०.९६ हेक्टर आर आरक्षित जमीन ही रहिवास क्षेत्रात समावेश करण्यासाठीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभा दि. २७-०२-२०१९ चे ठराव क्र. ३१ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. सबब उक्त जमीन ही विकास योजनेमध्ये रहिवाशी उपयोगासाठी दर्शविणेकरीता विकास योजनेत गौण फेरबदल करावयाचा आहे.

उक्त प्रस्तावित गौण फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा अध्यक्ष, नगर परिषद, बुलडाणा यांनी स्वाक्षरी करून नगर परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळात नागरिकांचे अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

उपरोक्त गौण फेरबदलाचे संदर्भात कोणाच्या काही सूचना व तक्रारी असतील तर त्यांनी ही अधिसूचना महाराष्ट्र शासन *राजपत्रात* प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत लेखी स्वरूपात मा. अध्यक्ष, नगर परिषद, बुलडाणा यांचेकडे सादर कराव्यात म्हणजे उक्त गौण फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरी करिता सादर करण्यापूर्वी त्याचा विचार करण्यात येईल.

नजमुन्निसा मोहम्मद सज्जाद,

बुलडाणा : अध्यक्षा,

दिनांक ०७ जून २०१९. नगर परिषद, बुलडाणा.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९१.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

Minor Modification to the Sanctioned Development Plan of Buldana Town, under Section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

No. PWD-MCB-550-2019.—

The Revised Development Plan of Buldana town has been sanctioned by Director of Town Planning, Maharashtra State, Pune under its Resolution No. D.P./Buldana (R) TPR-VI, dated 3rd November 1990 and has come into force with effect from 1st January 1991.

The following minor modification to the sanctioned Development Plan of Buldana Town under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 sanctioned by Municipal Council, Buldana *vide* General Council Resolution No. 31, dated 27-02-2019.

Minor Modification :

In Rev. Sr. No. 37/1 Total 0.96 Hectare Private land are reserved for Agricultural and Allied User (No Development Zone) in Development Plan is deleted and to be included in Residential Zone.

The above mentioned modified Developement Plan (part plan) duly sigend by President is kept open in the office of Municipal Council on working days during office hours for inspection for the public. In pursuance of Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. It is hereby notify that any person having any objections/ suggestions in respect of said proposed Minor Modification to said Development Plan, may communicate the same in writing to President, Municipal Council, Buldana within 30 (Thirty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette,* to that those can be consider before submitting the above proposal for sanction to Government.

NAJMUNNISA MOHAMMAD SAJJAD,

Buldana : President,

Dated the 07th June 2019. Municipal Council, Buldana.

पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिद्ध झालेली आहे.

१०

शनिवार, जुलै ६, २०१९/आषाढ १५, शके १९४१

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. ५५.

जिल्हाधिकारी, यांजकडून

आदेश

क्रमांक अका-१-नपाप्र-पो.नि.-कावि-५२८-२०१९.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १९ (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तसेच मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्रमांक रानिआ-नप-२०१९-प्र.क्र.४-का-०६, दिनांक २४-०५-२०१९ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी, यवतमाळ या प्रकटनाद्वारे असे जाहीर करतो की, दारव्हा नगर परिषदेच्या दिनांक २३-०६-२०१९ रोजी घेण्यात आलेल्या पोट-निवडणुकीमध्ये खालील उमेदवार त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या प्रभागामधुन नगर परिषद सदस्य म्हणून निवडून आले आहे.

अनुसूची

अ. क्र.	निवडून आलेल्या सदस्याचे नांव	प्रभाग क्रमांक	शेरा (जागा राखीव असेल तर कोणासाठी)
(१)	(२)	(३)	(४)
१	बोदडे रामदास सुखदेव	२-अ	अनुसूचित जाती

यवतमाळ :
दिनांक ५ जुलै २०१९.

अजय गुल्हाने,
जिल्हाधिकारी, यवतमाळ.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. ५६.

BY COLLECTOR

ORDER

No. AK-MCA-By-Ele-WS-528-2019.—

In exercise of the powers vested in me under sub-section (*1*) of Section 19 of Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* & Industrial Townships Act, 1965 and powers delegated by the State Election Commission, Maharashtra *vide* letter No. SEC-MC-2019-CR-04-D-06, Dt. 24-05-2019. I, Ajay Gulhane, Collector, Yavatmal hereby publish the name of the person who has been declared as a Councillor of the Nagar Parishad, Darwha from the ward shown against his name in By-Election held on 23rd June 2019.

SCHEDULE

Sr. No.	Name of the Councillors Elected	Ward No.	Remarks (Where the seat is reserved, if so, for whom)
(1)	(2)	(3)	(4)
1	Bodade Ramdas Sukhadeo	2-A	Scheduled Castes

Yavatmal :
Dated the 5th July 2019.

AJAY GULHANE,
Collector, Yavatmal.

———

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म.शा.रा., अ.क्र. ५७.

जिल्हाधिकारी, यांजकडून

मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांचे पत्र क्रमांक रानिआ-नप-२०१९-प्र.क्र.५-का-६, दिनांक ०८ मे २०१९ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०, पोट-कलम (१) अन्वये यवतमाळ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी निम्नोक्त आदेशाच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे ढाणकी नगरपंचायत जितक्या प्रभागामध्ये विभागण्यात येईल त्या प्रभागाची संख्या व त्याची व्याप्ती निश्चित करण्याचे आणि ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गीयांच्या जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गीय स्त्रियांसह) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग दर्शविणारा प्रारुप मसुदा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०, पोट-कलम (१) च्या परंतुकामध्ये निश्चित केलेल्या पद्धतीप्रमाणे ढाणकी नगरपंचायत क्षेत्रातील रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यास अनुसरून आलेल्या हरकतींचा सर्वंकष विचार करून मी, यवतमाळ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाच्या कलम १०, पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून निम्नोक्त आदेश देत आहे.

आदेश

क्रमांक अ.का.१-नपाप्र-कावि-५३१-२०१९.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९, पोट-कलम (२) अन्वये मा. आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, अमरावती विभाग, अमरावती यांचे आदेश क्रमांक उपआ-नपाप्र-कावि-९३-२०१९, दिनांक २५ एप्रिल २०१९ च्या आदेशान्वये त्यांनी ढाणकी नगर पंचायतच्या बाबतीत खाली दर्शविल्याप्रमाणे निवडावयाच्या सदस्यांची संख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा धरून) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केलेल्या आहे.—

(१) निवडावयाच्या सदस्यांची एकूण संख्या १७

(२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा–

(अ) अनुसूचित जाती ०२

(ब) अनुसूचित जमाती ०२

(क) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग ०५

(३) स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरून) . . ०९

(४) उपरोक्त क्रमांक (३) पैकी वरील क्रमांक (२)(अ), (ब) व (क) येथील जागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या खालीलप्रमाणे राहील :

(अ) अनुसूचित जाती ०१

(ब) अनुसूचित जमाती ०१

(क) नागरिकांचा मागासवर्ग ०३

(५) स्त्रियांसाठी सर्वसाधारण जागा म्हणून राखून ठेवावयाच्या जागांची संख्या [अनुक्रमांक (३) समोरील नमूद केलेल्या जागा **वजा** अनुक्रमांक (४) समोरील नमूद केलेल्या जागा.] ०४

२. त्याअर्थी, आता, मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांचे पत्र क्रमांक-रानिआ-नप-२०१९-प्र.क्र. ५-का-६, दिनांक ०८ मे २०१९ व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून मी, यवतमाळ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी याद्वारे उक्त नगर परिषद क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्याची व्याप्ती या आदेशाच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत असून त्या प्रभागामध्ये (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसह) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग निश्चित करीत आहे.

३. या आदेशाच्या तारखेच्या निकट नंतरच्या पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ हा आदेश अंमलात येईल.

परिशिष्ट-३

नगरपरिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक ढाणकी प्रभाग निहाय लोकसंख्या, प्रभागाची व्याप्ती व आरक्षण

प्रभाग क्रमांक	प्रभागाचे नाव, असल्यास	प्रभागाची एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या	जागा क्रमांक	प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पूर्व, दक्षिण, पश्चिम)	आरक्षणाची स्थिती, किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु. जाती/अनु. जमाती/ नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु. जाती/अनु. जमाती/ नागरिकांच्या मागासवर्ग स्त्रियांसाठी धरुन)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	–	एकूण लोकसंख्या-९४६, एस.सी.-०, एस.टी.-९६,	– –	**व्याप्ती** :– मिटकरे यांच्या शेताजवळील महादेव मंदीर, हनिफ मास्टर उर्दू हायस्कूल. **उत्तर** :– खंड नं. १ मधील शेत सर्व्हे नंबर ७४ चे संपूर्ण क्षेत्र. **पूर्व** :– तुकाराम सुरोशे, दत्ता किराणा दुकान, अरूण येरावार, अरूणा कवटीकवार, गजानन मामिडवार. **दक्षिण** :– बाबुराव नरवाडे यांचा कोठा, भास्कर जमदडे, रामराव हळदे, लक्ष्मण चिचबनकर, दूध वितरण केंद्र. **पश्चिम** :– हनिफ मास्टर उर्दू शाळा ते फलसावंगी रोडपासून सर्व्हे नं. ७४ चे क्षेत्र.	सर्वसाधारण.

परिशिष्ट-३—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२	–	एकूण लोकसंख्या-१०५३, एस.सी.-१९७, एस.टी.-८७,	–	**व्याप्ती** :– अंगणवाडी क्र. ८, ९, पोचीमाय मंदिर, गणपती मंदिर, बालाजी मंदिर. **उत्तर** :– अंगणवाडी क्र. ८ व ९ ते शेख अतिक शेख राजा ते संभा दिघलवाड ते दिलीप कदम ते पांडे शेत कडून दत्तात्रय गायकवाड. **पूर्व** :– दत्तात्रय गायकवाड यांचे घर ते सुभाष कुचेरीया यांची मालमत्ता. **दक्षिण** :– सुभाष कुचेरीया यांच्या मालमत्तेपासून ते किशोर भंडारी ते कमचंद सोनी महावीर सोनी ते शेख हाफीज शेख इब्राहीम ते प्रकाश देवांग ते इसाक डॉ. ते गफार गुलाबपासून ते प्रफुल मुक्कावार ते शिवाजी चौक प्रशांत चंद्रे यांचा कोठा. **पश्चिम** :– शिवाजी चौक, प्रशांत चंद्रे यांचा कोठा ते बालाजी मंदिर ते आनंदा सोनुने यांचे घरापर्यंत.	नागरिकांचा मागासप्रवर्ग (महिला).
३	–	एकूण लोकसंख्या-१०८१, एस.सी.-६५२, एस.टी.-७०,	–	**व्याप्ती** :– सार्वजनिक महिला शौचालय, बारव विहीर, हनुमान मंदिर, आठवडी बाजार, जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा, जैन समाधी स्थळ, बौद्ध विहार, खरूस पांदन, पठाण कब्रस्थान. **उत्तर** :– खंड नं. १ मधील शेत सर्व्हे नंबर ७४ चे संपूर्ण क्षेत्र. **पूर्व** :– खंड नं. १ मधील २३८ चे संपूर्ण क्षेत्र व खंड नं. २ मधील १०५, १०६, १०७, १०९ चे संपूर्ण क्षेत्र. **दक्षिण** :– इंदुबाई कवडे यांचे घर ते पठाण कब्रस्थान ते रामराव गायकवाड ते संजय बावने यांचे घरापर्यंत. **पश्चिम** :– राम नोमूलवार यांचे दुकान ते गायकवाड यांची खुली जागा ते वसंत कोडगीरवार यांचे जुने किराणा दुकान ते शाम कोडगीरवार यांचे दुकान ते अशोक रुनीवाल यांचे घर ते जैन स्थानक ते संजय भंडारी यांचे घर ते सुभाष कोठारी यांचे घरापर्यंत ते कत्तरवाड यांचे घरापर्यंत.	अनुसूचित जाती.
